# आदिम,संस्कृती,अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र

## मु.फलोदे,पो.तळेघर,ता.आंबेगाव, जिल्हा-पुणे

**( रजि नं- एफ 47,365 )**

# वार्षिक अहवाल

## सन -२०१८-१९

# अनुक्रमणिका


- प्रस्तावना
- साक्षरता प्रकल्प
- शिक्षण विषयक उपक्रम
- आरोग्य विषयक उपक्रम
- रोजगार विषयक उपक्रम
- शासकीय योजनांचा समन्वय
- पर्यावरण विषयक उपक्रम
- संशोधन प्रकल्प
- साध्य बाबी
- कार्यकारी मंडळ

# प्रस्तावना

आदिम संस्कृती अभ्यास संशोधन व मानव विकास केंद्र हि संस्था आदिवासी,दलित व वंचित घटकांच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कटिबद्ध असणारी संस्था आहे.संशोधन व अभ्यास या आधारे या वंचित घटकांच्या विकासप्रक्रियेत सकारात्मक हस्तक्षेप संस्था करत आहे.या अनुषंगाने विविध उपक्रम,छोटे अभ्यास संस्था संस्था सातत्याने करीत असते.या प्रक्रियेत समाजातील विविध अभ्यासू लोकांना सोबत घेऊन संस्था आपल्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी कार्य करीत आहे.

सन २०१८ चा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना नक्कीच संस्थेला आनंद होत आहे.या वर्षात आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात असणाऱ्या देवराया यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभागाच्या सहकार्यातून एक अभ्यासप्रकल्प करण्यात आलेला आहे.या अभ्यासप्रकल्पाचा अजून अहवाल बाकी आहे.परंतू  हा अहवाल या भागातील देवराया अधिक चांगल्या पद्धतीने कशा जतन केल्या जाव्यात याबाबत काही मार्गदर्शक सूत्रे मांडणार आहे.

या वर्षात या अभ्यास प्रकल्पाबरोबरच, सन २०१७ या वर्षात सुरु करण्यात आलेले १० ठिकाणी साक्षरता वर्ग याचे संयोजन व पर्यवेक्षण करून हा हा उपक्रम अधिक प्रभावशाली करण्यात नक्कीच यश प्राप्त झालेले आहे.याबरोबरच अजून १७ ठिकाणी नवीन साक्षरता वर्गाचा आरंभ हि याच वर्षाच्या अखेरीस करण्यात आलेला आहे.साक्षरता वर्गाच्या माध्यमातून निरक्षर महिला-पुरुष यांच्यामध्ये विविध प्रकारची जाणीवजागृती राबवली जात आहे.या साक्षरता प्रकारचे महत्वपूर्ण यश म्हणजे आदिवासी भागातील महिलांना एक आत्मभान देण्याचे कार्य हा प्रकल्प करत आहे.

याबरोबरच रोजगार निर्मिती यासाठी स्थानिक वनसंपदा वापरून बांबूचे केलेले आकाशकंदील हे या वर्षातील अत्यंत महत्वाचा उपक्रम ठरला.यामुळे एकूण ३५,००० रुपये १० आदिवासी कुटुंबाना दीपावली सणाच्या वेळेस त्यांची मजुरी म्हणून मिळाली.

अभ्यास,संशोधन व प्रत्यक्ष कृतिकार्यक्रम याधारे संस्थेचे आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात मुलभूत स्वरूपाचे काम सुरु आहे.या कामासाठी आम्हाला सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था,सरकारी विभाग,व्यक्ती संघटना यांचे आम्ही ऋण व्यक्त करतो.व यापुढे हि मुलभूत व शाश्वत स्वरूपाचे काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न संस्था नक्कीच करेल,या आशावादासह आम्ही थांबतो.

**संस्थेचे कार्यकारी मंडळ**

# साक्षरता प्रकल्प

## प्रस्तावना –

औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षण हि गाव विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे.या अनुषंगाने दहा साक्षरता वर्ग आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात सुरु केले आहेत.ऑगस्ट २०१७ मध्ये रोटरी क्लबच्या सहकार्याने हा साक्षरता प्रकल्प सुरु झालेला होता.हा प्रकल्प २०१८ मधील सप्टेंबर महिन्यापर्यंत सुरु होता.या साक्षरता वर्गात लेखन,वाचन याबरोबरच जीवनउपयोगी साक्षरता हि प्रदान केली जात आहे.या साक्षरता प्रकल्पाच्या अनुषंगाने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.व त्यानंतर या साक्षरता वर्गात साक्षरतेचे धडे घेणाऱ्या महिला-पुरुष यांची राज्य साधन केंद्र पुणे या भारत सरकारच्या अधिकृत संस्थेच्या वतीने मुलभूत साक्षरता परीक्षा आयोजित करण्यात आली होती.या परीक्षेच्या आधारे नवसाक्षर व स्वयंसेवक यांना प्रमाणपत्र हि वितरीत करण्यात आले.

## प्रकल्पाचा उद्देश –

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी वाडी वस्तीवर साक्षरता वर्ग सुरु करून आदिवासी निरक्षर यांना साक्षर करणे.
- साक्षरता वर्गात लेखन,वाचन,अंकगणित याबरोबरच कायदा साक्षरता,आर्थिक साक्षरता,आपत्ती व्यवस्थापन साक्षरता व आरोग्य साक्षरता याविषयक मार्गदर्शन साक्षरता वर्गातील महिला-पुरुषांना देऊन त्यांना कायदेविषयक ज्ञान व माहिती सोप्या भाषेत देणे.
- साक्षरता वर्गातील महिला व पुरुष यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभूत हक्क व कर्तव्ये यांची त्यांना जाणीव करून देणे.
- साक्षरता वर्गाच्या माध्यमातून व्यक्तिगत व सामाजिक विकास प्रक्रियेला चालना देणे.
- गावाच्या ग्रामसभेत लोकांचा सकारात्मक हस्तक्षेप वाढवा यासाठीचे विविध माहिती देऊन साक्षरता वर्गातील महिलांना व पुरुषांना प्रशिक्षित करणे.

## प्रकल्पा अंतर्गत झालेले विविध कार्यक्रम

### 1. साक्षरता वर्गाचे मूल्यमापन-

साक्षरता वर्गाचे सातत्याने मूल्यमापन केल्याने साक्षरता वर्गाची स्थिती व गती समजून येते व यामुळे साक्षरता वर्गाच्या अध्यापनात व इतर कार्यक्रमाच्या नियोजनात योग्य ते बदल करता येतात याअनुषंगाने दिनांक २६-१-२०१८ रोजी तळेघर गावातील साक्षरता वर्गाचे मूल्यमापन डॉ.हनुमंत भवारी यांनी केले.

दिनांक ३०-१-२०१८ रोजी महाळुंगे गावातील साक्षरता वर्गाचे मूल्यमापन डॉ.माणिक बोऱ्हाडे यांनी केले. व याच दिवशी पिंपरी गावातील साक्षरता वर्गाचे मुल्यमापन प्रा.संजय मेमाणे यांनी केले.या साक्षरता वर्गाच्या मूल्यमापनाच्या माध्यमातून साक्षरता वर्गाची सद्यस्थिती कळण्यास मदत झाली.या मूल्यमापनाच्या माध्यमातून समोर आलेली परिस्थिती समजून घेऊन ती दूर करण्याचा प्रयत्न केला गेला.व याच साक्षरता वर्गाच्या माध्यामातून उत्कृष्ट साक्षरता वर्गाना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.उर्वरित साक्षरता वर्गाचे मूल्यमापन शहीद राजगुरू ग्रंथालयाच्या टीमने केले.



### 2. कायदेविषयक मार्गदर्शन

दिनांक ४,फेब्रवारी,२०१८ रोजी तळेघर या गावात साक्षरता वर्गात शिकवणाऱ्या व शिकणाऱ्या अशा सुमारे ४० निवडक महिलांची एक दिवसीय बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी महिलांना,महिलांच्या कायद्याविषयी मार्गदर्शन किरणताई मोघे यांनी केले.किरणताई मोघे या जनवादी महिला संघटनेच्या राज्याच्या नेत्या आहेत.त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत महिला विषयक कायद्यांची माहिती दिली.विशेषता कौटुंबिक हिंसाचार कायदा याविषयी त्यांनी

सविस्तर मांडणी केली.यावेळी महिलांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी सविस्तर माहिती दिली .महिलांचे प्रश्न त्यांच्या मनातील शंका लक्षात घेता फक्त महिलांचेच स्वतंत्र कायदेविषयक शिबीर आयोजित करणे गरजेचे वाटते.




### 3. नवीन साक्षरता वर्ग उद्घाटन -

दिनांक ११-२-२०१८ रोजी भागीतवाडी,पोखरी येथे नवीन साक्षरता वर्ग सुरु करण्यात आला.या साक्षरता वर्गात एकूण २० महिला-पुरुष शिक्षण घेत आहे.या कार्यक्रमाला पोखरी गावचे उपसरपंच सचिन भागीत उपस्थित होते व आदिम संस्थेचे डॉ.अमोल वाघमारे इ.उपस्थित होते.यावेळी उपस्थित महिलांना गावचे उपसरपंच सचिन भागीत यांनी मार्गदर्शन करून साक्षरता वर्गाची गरज नमूद केली.




### 4. नवसाक्षर स्नेहसंमेलन –

दिनांक २५-३-२०१८ रोजी फलोदे येथे दहा साक्षरता वर्गात शिकत असणाऱ्या महिलांचे एक दिवसीय स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले.या स्नेहसंमेलनात नवसाक्षर महिलांना तालुक्याचे तहसीलदार,श्री.रविंद्र सबनीस,पोलीसप्रमुख **श्री.किरण भालेकर यांनी मार्गदर्शन** केले.याबरोबरच नवसाक्षर महिलांनी विविध लोकगीते सादर केली.व आपले अनुभव हि कथन केले.नवसाक्षर महिलांना अभिव्यक्त करून देणारा हा कार्यक्रम होता.या

कार्यक्रमाला रोटरी क्लबचे जिल्हा प्रांतपाल उपस्थित होते.याबरोबरच रोटरी क्लबचे विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.याबरोबरच परिसरातील तीन गावांचे सरपंच हि यावेळी उपस्थित होते.




## 5. साक्षरता वर्गाचे जाणीव जागृती कार्यक्रम -

साक्षरता वर्गात मूलभूत साक्षरतेबरोबरच विविध गावविकास प्रकल्पांची माहिती दिली जाते. फलोदे गावातील नवसाक्षर महिलांना हिवरे बाजार गावाची यशोगाथा दाखवण्यात आली.यावेळी हि फिल्म पाहिल्यानंतर आपल्या गावाची स्थिती काय आहे व ती कशी बदलता येईल याबाबत हि सकारात्मक चर्चा झाली.याबरोबरच विविध साक्षरता वर्गात आरोग्य व यशस्वी गावांच्या यशोगाथा दाखवून त्यावर चर्चा घडवून आणल्या गेल्या.साक्षरता वर्गात सातत्याने केली जाणारी विविध विषयांवर जाणीवजागृती हि महिला,पुरुषांना आत्मभान निर्माण करून देण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.




## 6. साक्षरता वर्गात महिला दिन साजरा –

८ मार्च हा जागतिक महिला दिन आठ साक्षरता वर्गामध्ये साजरा करण्यात आला.यावेळी महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले.व महिलादिनाच्या अनुषंगाने स्वयंसेवक महिलांनी वर्गातील महिलांना मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम तिरपाड,म्हाळुंगे,पिंपरी या गावातील साक्षरता वर्गात मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.तिरपाड या गावात सुरु असलेल्या साक्षरता वर्गातील महिलांनी यावेळी लेझीम खेळून महिला दिन साजरा केला तर म्हाळुंगे व पिंपरी येथे विविध गुणदर्शन स्पर्धा घेऊन जागतिक महिला दिन साजरा केला गेला.साक्षरता वर्गात यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून महिलांनी आपली मनोगते हि मांडली.




## 7. स्वंयसेवक बैठका -

साक्षरतेचे वर्ग नियमित सुरु राहावेत यासाठी या साक्षरता वर्गात शिकविणाऱ्या स्वयंसेवक ताई यांची दरमहा बैठक पार पडते.या आढावा बैठकीत पुढील महिन्यात साक्षरता वर्गात काय शिकवावे याबाबत मार्गदर्शन केले जाते. याबरोबरच मागील महिन्यात झालेले अध्यापन,यादरम्यान आलेल्या अडचणी स्वयंसेवक ताई यांचे अनुभव याबाबत सविस्तर चर्चा केली जाते.स्वयंसेवक यांच्या ज्ञानात,कौशल्यात व माहितीत नवीन भर कशी पडेल या अनुषंगाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.संस्थेचे सद्यस्थितीत जे कार्यालय आहे.तेथे हि बैठक आयोजित केली जाते.या बैठकीला संस्थेचे डॉ अमोल वाघमारे नियमित उपस्थित राहतात.



## 8. जाणीव-जागृती साठी कलापथक कार्यक्रम-

२५ ते ३० मे २०१८,दरम्यान पिंपरी,महाळुंगे,कुशिरे बु.,कुशिरेखु,तिरपाड,भागीतवाडी,तळेघर या सात गावांमध्ये,कलापथकाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या कलापथकाच्या माध्यमातून रोजगार हमी कायदा,आदिवासी वनाधिकार कायदा,व साक्षरतेचे महत्व इ.विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.या सात गावांमध्ये झालेल्या कार्यक्रमात सुमारे ५०० महिला-पुरुषांपर्यंत पोहचता आले.या कलापथकाच्या माध्यमातून लोकांमध्ये विविध कायद्यांविषयी जाणीव -जागृती घडवून येण्यास नक्कीच मदत होईल.या कलापथकात अशोक जोशी,अमोल वाघमारे,कृष्णा वडेकर,अशोक पेकारी व स्वयंसेवक महिला सहभागी झाल्या होत्या.




## 9. कायदा साक्षरता उद्बोधन –

१ जून २०१८ रोजी तळेघर गावातील साक्षरता वर्गात शिकणाऱ्या सुमारे ४० महिलांना त्यांच्या दैनदिन आयुष्यात उपयुक्त ठरणाऱ्या कायद्यांची माहिती देण्यात आली.AD.अर्चना मोरे यांनी उपस्थित महिलांना, महिलांविषयक असणाऱ्या कायद्यांची माहिती सहज व सोप्या भाषेत दिली.यावेळी महिलांच्या मनातील विविध प्रश्न व शंका यांचे निरसन श्रीमती मोरे यांनी केले.महिलांना यातील मिळालेली माहिती त्यांचा आत्मविश्वास दुणावणारी ठरली.




## 10. साक्षरता वर्ग उद्घाटन

औपचारिक शिक्षणाचा दर्जा उंचवायचा असेल तर अनौपचारिक शिक्षणाची व्याप्ती व गुणवत्ता वाढीस लागली पाहिजे.हि भूमिका स्पष्ट असल्याने आपण साक्षरता कार्यक्रमाची चळवळ वेगळ्या पद्धतीने राबवीत आहे.साक्षरता कार्यक्रमात लेखन,वाचन,गणित याबरोबरच आर्थिक,कायदा,आरोग्य साक्षरता हि या साक्षरता कार्यक्रमाच्या माध्यमातून दिली जाणार आहे.असे १७ साक्षरता वर्ग या आदिवासी भागात सुरु करण्याचे नियोजन आहे.या साक्षरता वर्गाचे उदघाटन दि.१७-९-२०१८ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय येथे पार पडले.या साक्षरता वर्गाच्या माध्यमातून सुमारे ४०० महिला-पुरुष साक्षर होणार आहेत.




## 11. साक्षरता वर्गांचा अभ्यासक्रम विकसित कार्यशाळा-

औपचारिक शिक्षणाचा दर्जा उंचवायचा असेल तर अनौपचारिक शिक्षणाची व्याप्ती व गुणवत्ता वाढीस लागली पाहिजे.हि भूमिका स्पष्ट असल्याने आपण साक्षरता कार्यक्रमाची चळवळ वेगळ्या पद्धतीने राबवीत आहे.साक्षरता कार्यक्रमात लेखन,वाचन,गणित याबरोबरच आर्थिक,कायदा,आरोग्य साक्षरता हि या साक्षरता कार्यक्रमाच्या माध्यमातून दिली जाणार आहे.असे १७ साक्षरता वर्ग या आदिवासी भागात सुरु करण्याचे नियोजन आहे.या साक्षरता वर्गातील अभ्यासक्रम हा निरक्षर व्यक्तीला कृतीप्रवण करणारा असावा.त्याला हा अभ्यासक्रम आपला वाटावा या हेतूने या साक्षरता वर्गाचा अभ्यासक्रम स्थानिक स्तरावरच तयार करण्याचे ठरले.यानुसार दि.२८,२९ सप्टेंबर २०१८ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय येथे हा अभ्यासक्रम व साक्षरता वर्गात अध्यापनाची पद्धत निश्चित करणेसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेत डॉ.बाळकृष्ण बोकील सहभागी झाले होते.या बरोबरच या भागातील मागील वर्षातील साक्षरता वर्गातील स्वयंसेविका हि सहभागी झाल्या होत्या.या कार्यशाळेत काही अभ्यासक्रमांचा भाग विकसित करण्यात आला.




## 12.मूलभूत साक्षरता परीक्षा –

मागील वर्षभरात १० आदिवासी गावांत साक्षरता वर्ग सुरु करण्यात आले होते. यावेळी ज्या निरक्षर महिला या साक्षरता वर्गाच्या माध्यमातून साक्षर झाल्या.त्यांची मुलभूत साक्षरता परीक्षा दि.१०-११-२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती.हि परीक्षा एकूण १० साक्षरता वर्गाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.यावेळी सुमारे १७० निरक्षर

महिलांनी साक्षरता वर्गाची मुलभूत साक्षरता परीक्षा दिली.या मुलभूत साक्षरता परीक्षेचे संयोजन राज्य साधन केंद्राच्या वतीने केले होते.




## 13. कलाजत्था –

दि.२०-११-२०१८ रोजी आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील ४ गावांमध्ये स्थानिक किसान सभा या संघटनेचे कार्यकर्ते यांच्या सहकार्यातून आदिवासी वनाधिकार कायदा या विषयी गावात सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.यावेळी सामुहिक वनहक्काचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.गीते व छोटी नाटिका यामाध्यमातून हा कायदा सोप्या पद्धतीने ग्रामस्थांना समजावून सांगण्यात आला.व याबरोबरच साक्षरता वर्गात शिकत असणाऱ्या महिला –पुरुषांना प्रेरित करून त्यांना सन्मानित करण्यात आले.




## 14. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण -

दि.२१-११-२०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन विभाग,यशदा,पुणे येथे या विभागाचे विभागप्रमुख श्री.सूपनिकर सर यांच्या सोबत संस्थेचे श्री.अमोल वाघमारे यांची बैठक पार पडली.या बैठकीत साक्षरता वर्गात शिकत असणारया प्रौढ महिला-पुरुष यांना आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले.यानुसार फलोदे गाव व परीसरातील सुमारे १० महिला-पुरुषांना याविषयक तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले.हे १० साधन व्यक्ती आता **परिसरातील नागरिकांना व साक्षरता वर्गात शिकणाऱ्या महिला-पुरुषांना आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देणार आहेत.**



## 15.कायदा साक्षरता शिबीर –

दि.१६-१२-२०१८ रोजी राजपूर ता.आंबेगाव येथील साक्षरता वर्गात कायदा साक्षरता विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.यावेळी महिलाविषयक कायद्यांची माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली.हा कार्यक्रम आलोचना संस्था यांच्या सहकार्यातून आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाच्या संयोजनात अशोक जोशी,संगीता लोहकरे यांनी मोलाची भूमिका पार पडली.साक्षरता वर्गात नियमित कायदा साक्षरता देऊन महिलांची कायदेविषयक समज कशी वाढेल यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात होते.



## १६.कायदा साक्षरता शिबीर –

दि.२० -१-२०१९ रोजी असाणेता.आंबेगाव येथील साक्षरता वर्गाच्या माध्यमातून तालुका विधी सेवा प्राधिकरण यांच्या सहकार्यातून  कायदा साक्षरता विषयक विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी घोडेगाव न्यायालयातील न्यायाधीश व वकील उपस्थित होते.यावेळी महिलाविषयक कायद्यांची माहिती,जमिनीविषयक कायदे याविषयी माहिती  उपस्थित महिला-पुरुषांना देण्यात आली.



## १७.रक्तपांढरी आजाराविषयक उद्बोधन कार्यक्रम –

शिनोली ता.आंबेगाव येथील ठाकरवस्ती येथे एक साक्षरता वर्ग सुरु आहे.या साक्षरता वर्गातील महिलांना आरोग्यसेविका श्रीमती वर्षा मावळे यांनी रक्तपांढरी आजार त्याची करणे व त्यावर मात करण्यासाठी करावयाची उपाययोजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन दि.३-२-२०१९ रोजी सांयकाळी केले.यावेळी प्रश्न-उत्तरे हि पार पडली.यावेळी अमोल वाघमारे उपस्थित होते.

## १८.साक्षरता स्वयंसेवक बैठक –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात एकूण १७ साक्षरता वर्ग सुरु आहेत.या साक्षरता वर्गात शिकण्यास येणाऱ्या महिलांना लेखन वाचन याबरोबरच विविध प्रकारची साक्षरता प्रदान केली जात आहे.या अनुषंगाने या साक्षरता वर्गात शिकविण्याचे काम करणाऱ्या स्वयंसेवक ताई यांची आढावा बैठक दि.१४-३-२०१९ रोजी शहिद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे पार पडली.या बैठकीत साक्षरता वर्गात नवीन जे उपक्रम सुरु करायचे आहे अशा उपक्रमांची चर्चा करण्यात आली.



## **१९ .H.B.तपासणी शिबीर** –

दि.१८-३-२०१९ रोजी राजपूर ता.आंबेगाव येथील सुमारे २३ महिलांची H.B.तपासणी शिबीर पार पडले.तळेघर ता.आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी डॉ.चोपडा MADAM उपस्थित होत्या.त्यांनी रक्तपांढरी या आजाराविषयक माहिती उपस्थित महिलांना सांगितली.या सर्व महिलांना पुढील सहा महिने या आजराविषयक मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे.या सर्व महिलांची रक्ततपासणी व त्याचा अहवाल याचे एम.के.सी.एल.च्या सहकार्याने जतन करून एक छोटासा अभ्यास केला जाणार आहे.





## 2० .H.B.तपासणी शिबीर –

दि.१९-३-२०१९ रोजी जांभोरी ता.आंबेगाव येथील सुमारे ६२ महिलांची H.B.तपासणी शिबीर पार पडले.तळेघर ता.आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी डॉ.चोपडा MADAM उपस्थित होत्या.त्यांनी रक्तपांढरी या आजाराविषयक माहिती उपस्थित महिलांना सांगितली. या सर्व महिलांना पुढील सहा महिने या आजराविषयक मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे.




## 2१.रक्तपांढरी आजाराविषयक उद्बोधन कार्यक्रम –

भोईरवाडी ता.आंबेगाव येथे दि.२३-३-२०१९ रोजी रक्तपांढरी आजाराविषयक उद्बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी आलोचना संस्थेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर मार्गदर्शन केले.या आजाराची लक्षणे,त्यावरील उपचार व घ्यावयाची काळजी याविषयक सविस्तर चर्चा यावेळी झाली.यावेळी साक्षरता वर्गातील सुमारे ३० महिला उपस्थित होत्या.या आजाराविषयक पुढील काळात हि सातत्याने माहिती या महिलांना दिली जाणार आहे.




## २२.रक्तपांढरी आजाराविषयक उद्बोधन कार्यक्रम –

राजेवाडी ता.आंबेगाव येथे दि.२३-३-२०१९ रोजी रक्तपांढरी आजाराविषयक उद्बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी आलोचना संस्थेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर मार्गदर्शन केले.या आजाराची लक्षणे,त्यावरील उपचार व घ्यावयाची काळजी याविषयक सविस्तर चर्चा यावेळी झाली.यावेळी साक्षरता वर्गातील सुमारे २० महिला उपस्थित होत्या.या आजाराविषयक पुढील काळात हि सातत्याने माहिती या महिलांना दिली जाणार आहे.




## साक्षरता प्रकल्पातून साध्य बाबी –

- साक्षरता वर्गात निरक्षर महिला नियमित वा कधी अनियमित वर्षभर येत होत्या हीच अत्यंत महत्वाची जमेची बाजू होय.
- या साक्षरता वर्गात लेखन,वाचन याबरोबरच दैनदिन आयुष्यात उपयुक्त ठरणारी माहिती हि सांगण्यात आली.
- साक्षरता वर्गात एक पुस्तक वाचून दाखविण्याचा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.यामुळे काही महिलांना लेखन,वाचन यापेक्षा हे पुस्तक ऐकण्याची सवय जास्त प्रभावित करत होती.
- साक्षरता वर्गात येणाऱ्या एकूण महिलांपैकी सुमारे ७० टक्के महिला या चांगले वाचू,लिहू शकतात.
- साक्षरता वर्गात येणाऱ्या १०० टक्के महिला आता सही करतात.
- साक्षरता वर्गात येणाऱ्या नवसाक्षर महिला छोटी-छोटी,पुस्तके हि वाचू लागलेत.
- साक्षरता वर्गातील नवसाक्षर महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती हळूहळू वाढू लागली आहे.
- साक्षरता वर्गात मिळालेल्या कायद्याच्या माहितीचा उपयोग ते आपल्या दैनदिन आयुष्यात व ग्रामसभेत करत आहेत.
- महाळुंगे गावातील महिलांनी ग्रामसभेत जाऊन रोजगार हमी कायद्याची अंमलबजावणी करा अशी मागणी केली.हे साक्षरता वर्गाचेच यश होय.
- महिलांमध्ये एकोपा वाढण्यास साक्षरता वर्ग उपयुक्त ठरत आहे.
- महिलांना बँक व्यवहार करण्यास साक्षरता उपयोगी ठरत आहे.

# शिक्षण विषयक उपक्रम

## प्रस्तावना –

माणसाच्या मुलभूत गरजांपैकी शिक्षण आणि आरोग्य हि एक महत्वपूर्ण मूलभूत गरज आहे. शिक्षण हि विकासाची पहिली पायरी आहे,शिक्षणात आपण काम करताना औपचारिक,अनौपचारिक व सहज शिक्षण या तीनही शिक्षण प्रक्रियेत संस्था शक्य असेल ते काम करण्याचा प्रयत्न करते.या पार्श्वभूमीवर झालेले कार्य म्हणजे युनिक अकेडमी यांच्या सहकार्याने वर्षभर राबविलेला भाषिक अभ्यास प्रकल्प होय.याबरोबरच राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन या दिनाच्या निमित्ताने घोडेगाव महाविद्यालय येथे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.

पुणे येथील शैक्षणिक क्षेत्रात नावजलेली संस्था म्हणजे युनिक अकेडमी होय.या संस्थेच्या वतीने संचलित असलेले डॉ.रुखमाबाई शैक्षणीक संशोधन,केंद्र,पुणे यांच्या सहाय्याने व आदिम संस्कृती संस्था यांच्या समन्वयातून फलोदे,ता.आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भाषिक व गणित विकास प्रकल्प सुरु करण्यात आला होता.या प्रकल्पाअंतर्गत मुलांची भाषिक व अंकगणित विषयक कौशल्ये कशी विकसित करता येईल.यासाठी विविध शैक्षणिक साधने व पद्धती वापरून हि कौशल्ये वृद्धिंगत होणेसाठी प्रयत्न केले जाणार होते. या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ञ श्रीमती.विनया मालती हरी करणार आहेत.

## प्रकल्पाचे उद्देश –

- मुलांची भाषिक व अंकगणित विषयक कौशल्ये कशी विकसित करणे.
- मुलांना विविध शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे.
- शिक्षकांना भाषिक व अंकगणित कौशल्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देणे.
- शाळेतील मुला-मुलींची गुणात्मकता वाढविणे.
- भाषा व गणित हे दोन विषय मुलांचे पक्के करून त्यांची आकलन क्षमता वाढविणे.

## प्रकल्पाअंतर्गत पार पडलेले कार्यक्रम –

### 1.राष्ट्रीय वैज्ञानिक दुर्ष्टीकोन दिन –

संपूर्ण देशभरात दि.२० ऑगस्ट रोजी राष्ट्रीय वैज्ञानिक दुर्ष्टीकोन दिन साजरा केला गेला .या पार्श्वभूमीवर आपण घोडेगाव येथील वरिष्ठ महाविद्यालय व गोहे येथील आश्रमशाळा येथे साजरा केला गेला.घोडेगाव येथील बी.डी.काळे ,महाविद्यालय येथे दि.२० ऑगस्ट २०१८ श्री.लोखंडवाला सर यांचे वैज्ञानिक दुर्ष्टीकोन या विषयावर व्याख्यान पार पडले.या कार्यक्रमाला सुमारे १०० महाविद्यालयीन युवक उपस्थित होते.याप्रसंगी या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.इंद्रजीत जाधव उपस्थित होते.यावेळी विषयाची मांडणी करून झाल्यावर मुलांच्या मनातील प्रश्नांवर खुली चर्चा हि झाली.



## 2.जादूचे प्रयोग नव्हे तर विज्ञानाची मजा-

गोहे येथील शासकीय आश्रमशाळेत दि.२१ ऑगस्ट २०१८ रोजी राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिनाच्या अनुषंगाने अंधश्रद्धा निर्मुलन हा विषय प्रात्यक्षिकासह पार पडला.यावेळी अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते श्री.नवनाथ लोंढे सर यांनी उपस्थित मुला-मुलींना हा विषय समजावून सांगितला.



## 3.आश्रमशाळेतील मुला-मुलीना मार्गदर्शन कार्यक्रम-

आंबेगाव तालुक्यातील राजपूर या आदिवासी गावात शासकीय आदिवासी मुलांची आश्रमशाळा आहे.या आश्रमशाळेतील सुमारे ३०० मुला-मुलींसाठी शैक्षणिक स्वरूपाचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.डॉ.हनुमंत भवारी यांनी उपस्थित मुला-मुलीना व्याख्यान दिले.निर्भयता हीच यशाची पहिली पायरी आहे.याविषयक हे व्याख्यान होते.




## 4.स्वयंपाक गृह भेट -

युनिकअकेडमी संचलित डॉ.रुखमाबाई शैक्षणीक संशोधन,केंद्र,पुणे यांच्या सहाय्याने फलोदे ता.आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भाषिक व गणित विकास प्रकल्प सुरु आहे.या प्रकल्पाअंतर्गत मुलांची भाषिक व अंकगणित विषयक कौशल्ये कशी विकसित करता येईल.यासाठी विविध शैक्षणिक साधने व पद्धती वापरून हि कौशल्ये वृद्धिंगत होणेसाठी प्रयत्न केले जातात.दि.१२-९-२०१८ रोजी हा कार्यक्रम पार पडला.यावेळी शाळेतील मुलांना स्वयंपाक ग्रह दाखवून त्याची माहिती देण्यात आली.





## 5.अंगणवाडी भेट -

युनिक अकेडमी संचलित डॉ.रुखमाबाई शैक्षणीक संशोधन,केंद्र,पुणे यांच्या सहाय्याने फलोदे ता.आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भाषिक व गणित विकास प्रकल्प सुरु आहे.या प्रकल्पाअंतर्गत मुलांची भाषिक व अंकगणित विषयक कौशल्ये कशी विकसित करता येईल.यासाठी विविध शैक्षणिक साधने व पद्धती वापरून हि कौशल्ये वृद्धिंगत होणेसाठी प्रयत्न केले जातात.यासाठी छोट्याशा क्षेत्रभेटी हि आयोजित केल्या जातात.दि.२८- १०-२०१८ रोजी प्राथमिक शाळेतील मुलांना अंगणवाडी येथे जावून अंगणवाडी दाखवण्यात आली.त्यावेळी अंगणवाडी येथे असणाऱ्या विविध उपकरणे यांची माहिती देण्यात आली.मुलांच्या शंका निरसन करण्यात आल्या. क्षेत्रभेटीतून मुलांसाठी असणाऱ्या अनेक कुतुहलपूर्ण बाबींचे उत्तरे मुलांना सहजपणे मिळाली.यासाठी विनया मालती हरी व त्यांच्या सहकारी यांनी हि भेट घडवून आणली.



## 6.पुस्तक दिंडी

युनिक अकेडमी संचलित डॉ.रुखमाबाई शैक्षणीक संशोधन,केंद्र,पुणे यांच्या सहाय्याने फलोदे ता.आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भाषिक व गणित विकास प्रकल्प सुरु आहे.या प्रकल्पाअंतर्गत मुलांची भाषिक व अंकगणित विषयक कौशल्ये कशी विकसित करता येईल.यासाठी विविध शैक्षणिक साधने व पद्धती वापरून हि कौशल्ये वृद्धिंगत होणेसाठी प्रयत्न केले जातात.दि.७ - १२-२०१८ रोजी गावातून पुस्तक दिंडी काढली गेली.यावेळी संपूर्ण गावातून मुलांनी हि दिंडी काढली.व चौका-चौकात पुस्तके वाचून दाखवली.





## 7.भाषिक व अंकगणित याविषयक विविध प्रयोग –

जुलै,२०१८ मध्ये युनिक अकेडमी यांच्या सहकार्यातून फलोदे ता.आंबेगाव येथील शाळेत वर्षभर दरमहा युनिक अकेडमी येथील साधन व्यक्ती श्रीमती विनया मालती हरी व अश्विनी घोटाळे व योगिता काळे या तीन साधन व्यक्ती दरमहा एकदा शाळेला भेट देऊन संपूर्ण दिवस मुलांचे भाषिक व अंकगणित खेळ घेतले गेले.यावेळी अनेक गाणी व कृती आधारित उपक्रम हि घेण्यात येत आहे.हा उपक्रम सन २०१९ मध्ये संपणार आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून या भागातील मुलांना भाषिक व अंकगणित कौशल्ये आत्मसात करताना कोणत्या अडचणी येतात हे या अभ्यासातून स्पष्ट होईल.या प्रकल्पाला या शाळेचे श्री.शेंगाळे सर व उतळे सर यांचे खूप सहकार्य लाभले.हा प्रकल्प आदिवासी भागातील शैक्षणिक क्षेत्रात नक्कीच दिशादर्शक ठरेल.

## 8.शैक्षणिक TAB विषयक शिक्षकांना प्रशिक्षण –

रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून आंबेगाव व राजगुरुनगर येथील आदिवासी भागातील प्राथमिक शाळांना TAB देण्यासाठी आपण मागील सहा महिन्यांपासून प्रयत्नशील होतो.याची परिणीती म्हणून हे TAB रोटरी क्लब यानी देण्याचे मान्य केले.या अनुषंगाने या शाळांमधील शिक्षकांना हे TAB कसे वापरायचे याबाबतचे प्रशिक्षण दि.६-३-२०१९ रोजी पुणे येथे देण्यात आले.एकूण ७ शाळांना हे TAB देण्याचे नियोजन झालेले आहे.या tab मध्ये एम.के.सी.एल. ने विकसित केलेला अभ्यासक्रम आपल्याला अपलोड करता येईल का याबाबत रेवती madam यांच्याशी चर्चा केली जाणार आहे.



## 9.TAB वाटप-

रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून आंबेगाव व राजगुरुनगर येथील आदिवासी भागातील प्राथमिक शाळांना TAB देण्यासाठी आपण मागील सहा महिन्यांपासून प्रयत्नशील होतो.याची परिणीती म्हणून हे TAB रोटरी क्लब यानी देण्याचे मान्य केले.यानुसार दि.९-३-२०१९ रोजी हे TAB एकूण ७ शाळांना वाटप करण्यात आले.यावेळी रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.व शिक्षण विभागातील अधिकारी हि उपस्थित होते.




## प्रकल्पातून साध्य बाबी –

- फलोदे गावातील प्राथमिक शाळेत हा प्रकल्प राबविण्यात आला.
- या प्रकल्पातून मुले-मुली यांना नव्याने काही भाषिक खेळ व गाणी आत्मसात करता आली.
- याबरोबरच अंकगणिताची भीती दूर करण्यात हि या प्रकल्पाचा फार मोठा उपयोग झाला.
- मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागण्यास मदत झाली.
- मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागण्यात मदत झाली.
- मुलांमधील सजगता वाढीस लागण्यास मदत झाली.
- विविध शैक्षणिक साहित्याची निर्मिती या प्रकल्पातून करण्यात आली.
- गावातीलच विविध संस्थाना मुलांनी दिलेल्या भेटीतून त्यांचा परिसर अभ्यास वाढू लागला.
- या प्रकल्पाविषयी पालकांनी व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांनी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या.

# आरोग्य विषयक उपक्रम

## प्रस्तावना –

माणसाच्या मुलभूत गरजांपैकी शिक्षण आणि आरोग्य हि एक महत्वपूर्ण मूलभूत गरज आहे. आरोग्यावरचा या भागातील लोकांचा खर्च हा मोठा आहे.आदिवासी भागातील बदलती आहारपद्धती,सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची दुरवस्था व प्रचंड शारीरिक श्रम या सर्व कारणांमुळे आरोग्यव्यवस्था या भागातील डबघाईला आलेली आहे.या पार्श्वभूमीवर आरोग्य क्षेत्रात संस्था जाणीवपूर्वक मुलभूत स्वरूपाचे कार्य करीत आहे.याकामी पुणे येथील जन आरोग्य मंच हि डॉक्टरांची संघटना सहकार्य करीत आहे.

## उद्दिष्टे –

- आरोग्य विषयक माहिती ग्रामस्थांना देऊन आरोग्य साक्षरता गावातील ग्रामस्थांना देणे.
- प्रत्यक्ष आरोग्य शिबिरे आयोजित करून रुग्णांवर मोफत उपचार करणे.
- आरोग्य विषयक पर्यायी आरोग्यनीती जनते समोर सादर करणे.
- सार्वजनिक आरोग्यव्यवस्था याविषयी लोकांना माहिती देणे.
- सार्वजनिक आरोग्यव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे.

## प्रकल्पाअंतर्गत झालेले उपक्रम -

### १.कान,नाक घसा तपासणी शिबीर -

फलोदे गावातील महिला रक्तपांढरी आजारापासून मुक्त व्हाव्यात यासाठी विविध जाणीवजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जात आहे. याबरोबरच गावामध्ये आरोग्य शिबिरांचे हि आयोजन केले जात आहे.याचाच एक भाग म्हणजे दिनांक २७-१२-२०१७ रोजी कान-नाक-घसा या आजारावरील रुग्णाची तपासणी व औषधोउपचार करण्यात आले.यावेळी पुणे येथील तज्ञ डॉक्टर श्री.एम.जी.वाडेकर सर उपस्थित होते. यावेळी सुमारे ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली.यातील काही रुग्णांची पुढील उपचारासाठी पुणे येथे आणले जाणार आहे.



### ३.आरोग्य शिबीर,अगाने –

दि.१७-११-२०१८ रोजी तालुक्यातील अगाने या अत्यंत दुर्गम गावात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या आरोग्य शिबिराच्या प्रसंगी या गावातील ग्रामस्थांना आरोग्य साक्षरता उपक्रमाअंतर्गत आरोग्य विषयक माहिती देण्यात आली.डॉ.जालिंदर वाजे यानी हि माहिती सविस्तर उपस्थित ग्रामस्थांना सांगितली.यानंतर भीमाशंकर हॉस्पिटल येथील तज्ञ डॉक्टर यांनी उपस्थित रुग्णांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार केले.यावेळी सुमारे ५५ शालेय मुला-मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली.






## ४. रुग्णवाहिका लोकार्पण-

दि.१३-१-२०१९ रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे नवीन रुग्णवाहिका उपलब्ध झाली.या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा ग्रंथालयाच्या प्रांगणात पार पडला.यामुळे या भागात रुग्णांना लवकर दवाखान्यात नेणे सोयीस्कर होणार आहे.या रुग्णवाहिकासाठी विविध संस्थांनी सहकार्य करून या भागातील आरोग्याची गरज सोडविण्यासाठी हि रुग्णवाहिका उपलब्ध करून दिलेली आहे.या रुग्णवाहिकेसाठी संस्थेनेही ५०.००० रुपयांची मदत केलेली आहे.



## 5.पाककला स्पर्धा -

अंगणवाडीतील मुला-मुलीना,गावातील गर्भवती मातांना व स्तनदा मातांना पोषक आहार अंगणवाडीच्या माध्यमातून दिला जातो. **THR** ची पॅकेट हा आहार पौष्टिक असूनही ते चविष्ट नसल्याने व या पोषण आहाराचे महत्त्व निटपणे न सांगितल्याने हा आहार अनेकवेळा खाल्ला जात नाही.

या पार्श्वभूमीवर या पौष्टिक आहाराचे विविध पदार्थ बनविण्याची पाककला स्पर्धा दि.१२ जानेवारी २०१९ रोजी गोहे खु.येथील अंगणवाडी येथे आयोजित करण्यात आली होती.हा आहार अंगणवाडीतील मुले-मुली,गर्भवती माता,स्तनदा

माता यांनी नियमित खावा हा या स्पर्धेमागील हेतू होता.यावेळी सहभागी महिलांना बक्षीस वाटप करण्यात आले.व या पौष्टिक आहाराचे महत्व हि समजावून सांगण्यात आले.



## 6.पाककला स्पर्धा -

अंगणवाडीतील मुला-मुलीना,गावातील गर्भवती मातांना व स्तनदा मातांना पोषक आहार अंगणवाडीच्या माध्यमातून दिला जातो. **THR** ची पॅकेट हा आहार पौष्टिक असूनही ते चविष्ट नसल्याने व या पोषण आहाराचे महत्त्व निटपणे न सांगितल्याने हा आहार अनेकवेळा खाल्ला जात नाही.

या पार्श्वभूमीवर या पौष्टिक आहाराचे विविध पदार्थ बनविण्याची पाककला स्पर्धा दि.६-२-२०१९ रोजी फलोदे येथील महिलांची आयोजित करण्यात आली होती.हा आहार अंगणवाडीतील मुले-मुली,गर्भवती माता,स्तनदा माता यांनी नियमित खावा हा या स्पर्धेमागील हेतू होता.यावेळी सहभागी महिलांना बक्षीस वाटप करण्यात आले.व या पौष्टिक आहाराचे महत्व हि समजावून सांगण्यात आले.या स्पर्धेत सुमारे ३० महिला सहभागी झाल्या



## 7.रेशन विषयक कार्यशाळा -

दि.१-३-२०१९ रोजी फलोदे, येथील शहीद राजगुरू ग्रंथालयात अन्नसुरक्षा कायदा व रेशनिंग विषयी विविध नियम याचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाला ५ गावातील सुमारे ७० नागरिक उपस्थित होते.यावेळी साधन व्यक्ती श्री.अलाउद्दीन शेख सर यांनी या कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांनी हा विषय अधिकाधिक सोप्या पद्धतीने लोकांना सांगितला.





## 8.H.B.तपासणी शिबीर –

दि.१८-३-२०१९ रोजी राजपूर ता.आंबेगाव येथील सुमारे २३ महिलांची **H.B.**तपासणी शिबीर पार पडले.तळेघर ता.आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी डॉ.चोपडा **MADAM** उपस्थित होत्या.त्यांनी रक्तपांढरी या आजाराविषयक माहिती उपस्थित महिलांना सांगितली.या सर्व महिलांना पुढील सहा महिने या आजराविषयक मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे.या सर्व महिलांची रक्ततपासणी व त्याचा अहवाल याचे एम.के.सी.एल.च्या सहकार्याने जतन करून एक छोटासा अभ्यास केला जाणार आहे.



## 9.H.B.तपासणी शिबीर –

दि.१९-३-२०१९ रोजी जांभोरी ता.आंबेगाव येथील सुमारे ६२ महिलांची **H.B.**तपासणी शिबीर पार पडले.तळेघर ता.आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी डॉ.चोपडा **MADAM** उपस्थित होत्या.त्यांनी रक्तपांढरी या आजाराविषयक माहिती उपस्थित महिलांना सांगितली. या सर्व महिलांना पुढील सहा महिने या आजराविषयक मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे.



## साध्य बाबी –

- आरोग्याच्या प्रश्नात थेट आरोग्य शिबिरे घेऊन हस्तक्षेप करण्यात आला.
- रक्तपांढरी आजाराची तपासणी करून रक्तातील लोहाचे प्रमाण कमी असणाऱ्या महिलांना पुढील उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले गेले.
- आरोग्याच्या प्रश्नाच्या अनुषंगाने लोकांमध्ये आरोग्य साक्षरता विषयक जाणीवजागृती करण्यात आली.
- आपल्या आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सुमारे ५०० च्या वर रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले.
- कान,नाक,घसा यावर तज्ञ डॉक्टर बोलावून मोफत आरोग्य तपासणी व उपचार करण्यात आले.

# रोजगार विषयक उपक्रम

## प्रस्तावना –

रोजगार हा माणसाचा मुलभूत अधिकार आहे.रोजगाराशिवाय जीवनस्तर उंचावत नाही हे सर्वज्ञात असे आहे.रोजगाराची निर्मिती अधिकाधिक झाली तर बेरोजगारीची समस्या मिटते व बेरोजगारीची समस्या मिटली तर अनेक सामाजिक प्रश्न सुटण्यास मदत होतात.बेरोजगारी हि व्यक्तिगत समस्या नसते तर ती एक सामाजिक समस्या बनते व यातून अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात.आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात भरपूर पाऊस पडूनही उन्हाळ्यात पाण्याची दाही दिशा फिरावे लागते.व जंगल संपदा असूनही रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते.या पार्श्वभूमीवर या भागात येथेच उपलब्ध असणारी वनसंपदा व शेतमाल यावर प्रक्रिया करून काही रोजगार निर्मितीचे प्रयत्न संस्था करीत आहे.यासाठी रोटरी क्लब,एम.के.सी.एल.व विज्ञान आश्रम हे संस्थेला सहकार्य करीत आहे.

## उद्दिष्ट्ये –

- आदिवासी बेरोजगार युवक-युवती यांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- आदिवासी भागातील जंगलसंपदा यावर आधारित छोटे-छोटे व्यवसाय निर्माण करणे.
- आदिवासी भागात विविध व्यवसायिक कौशल्ये प्रशिक्षण आयोजित करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- आदिवासी भागातील रोजगारासाठीचे स्थलांतर रोखणे.

## प्रकल्पा अंतर्गत झालेले उपक्रम -

### १.रोजगार हमीचे काम

मूदगून वस्ती, फलोदे येथे रोजगार हमी कायद्याच्या माध्यमातून एका सार्वजनिक तळयातील गाळ काढण्याचे काम या महिन्यात झालेले आहे.यामुळे तळयातील पाणीसाठा वाढण्यास नक्कीच मदत होईल.या तळयाचे काम सुरु करण्यात पाणी समितीतील दोन सदस्यांनी पुढाकार घेतला होता.रोजगार हमीचे काम फलोदे गावातील मुदगून वस्ती येथे सुरु करण्यात आले.या वस्तीवर एक सार्वजनिक पाण्याचे तळे होते.या तळयातील गाळ काढण्याचे काम सुरु करण्यात आले.यातून सुमारे ६० महिला व पुरुषांना सुमारे १५ दिवस रोजगार उपलब्ध झाला.




### २.रोजगार हमीवर काम करणाऱ्या मजुरांसाठी प्रशिक्षण -

दिनांक १३-१४ मार्च २०१८ रोजी श्रम मंत्रालय,भारत सरकार यांच्या कामगार शिक्षण विभागांतर्गत दोन दिवसाचे रोजगार हमीच्या कामावरील मजुरांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.यावेळी उपस्थित महिलांना रोजगार हमी कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आले. सीमा काकडे,सीताराम जोशी,राजेंद्र घोडे यांनी या कायद्याविषयी माहिती दिली.




### ३.दूधप्रक्रिया व दूधउत्पादन वाढीच्या अनुषंगाने दोन दिवसीय प्रशिक्षण

दिनांक १८-१९ मार्च २०१८ रोजी जांभोरी ता.आंबेगाव येथे सुमारे ४० दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधप्रक्रिया व दूधउत्पादन वाढीच्या अनुषंगाने दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यासाठी जन शिक्षण संस्थान,पुणे यांची मदत घेण्यात आली होती.




### ४.रोजगार हमीचे काम

रोजगार समिती व पाणी समिती यांच्या पुढाकारातून रोजगार हमीचे काम फलोदे गावातील मुदगून वस्ती येथे सुरु करण्यात आले.या वस्तीवर एक सार्वजनिक पाण्याचे तळे होते.या तळ्यातील गाळ काढण्याचे काम सुरु करण्यात आले.यातून सुमारे ६० महिला व पुरुषांना सुमारे १५ दिवस रोजगार उपलब्ध झाला.


### ५.बांबू हस्तव्यवसाय प्रशिक्षण-

दि.९ व १० सप्टेंबर २०१८ रोजी फलोदे येथे आठ महिलांना बांबू पासून आकाशकंदील बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.विज्ञान आश्रम,पाबळ यांच्या सहाय्याने हे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणात बांबूपासून आकाशकंदील कसा बनवायचा हे शिकविण्यात आले.या भागात बांबू उत्पादन मोठ्या प्रमाणात होते परंतु बांबूवर प्रक्रिया करून कोणतेच उत्पादने या भागात केली जात नव्हती.या पार्श्वभूमीवर हे प्रशिक्षण नक्कीच उपयुक्त ठरणार आहे.दीपावली सणात आकाशकंदील तयार करून त्यांची विक्री करून रोजगार निर्मिती या भागात करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.




## ६.आकाशकंदील निर्मिती व त्याची विक्री

बांबू प्रशिक्षण कार्यक्रमानंतर फलोदे व पिंपरी गावातील सुमारे १२ कुटुंबाना १५० आकाशकंदील बनविण्याचे काम देण्यात आले.यानंतर हे आकाशकंदील पुणे येथे विक्री करण्यात आले.या आकाशकंदिलाच्या माध्यमातून या १२ आदिवासी कुटुंबाना प्रत्येकी १२०० रुपये प्रमाणे रोजगार देण्यात आला.यापुढे हि या कुटुंबाना रोजगार प्राप्ती वाढवून त्यांचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. दीपावलीच्या काळात दि.१ ते ४ नोव्हेंबर २०१८ या दरम्यान हे सर्व आकाशकंदील विक्री करण्यात आले.दि.१ नोव्हेंबर २०१८ रोजी हे आकाशकंदील एम.के.सी.एल.पुणे येथील कार्यालयात विक्रीसाठी ठेवण्यात आले यावेळी सुमारे ५६ आकाशकंदील विक्री करण्यात आले.यावेळी श्री.विनायक कदम व श्रीमती काजल पवार यांनी याकामी खूप सहकार्य केले

**साध्य बाबी** –

- बांबू पासून बनवलेले आकाशकंदील यातून सुमारे १७ आदिवासी महिला-पुरुषांना सुमारे ३५००० रुपये मजुरी मिळाली.
- बांबू पासून विविध वस्तू तयार करून त्याची विक्री केली जाणार आहे.
- रोजगार हमी कायद्याची यशस्वी अंमलबजावणी करून सुमारे ८० मजुरांना मजुरी प्राप्त झाली.
- दुध प्रक्रिया यावर आधारित झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर पुढे हे दुध उत्पादक शेतकरी एकत्रित येत त्यांनी दुधावर प्रक्रिया करणारी मशीन खरेदी केली व आपला व्यवसाय अधिक वृद्धिंगत केला.

# शासकीय योजनांचा समन्वय

## प्रस्तावना –

शासकीय योजनांचा लाभ खऱ्या गरजू लोकांना मिळवून देण्यासाठी संस्था सतत प्रयत्नशील असते.या पार्श्वभूमीवर लोकांना कोणत्या शासकीय योजना पात्र ठरू शकतात याबाबत एम.के.सी.एल.यांनी महालाभार्थी हे वेबपोर्टल तयार केले आहे.या वेबपोर्टलवर नागरिकांनी आवश्यक ती माहिती भरल्यानंतर नागरिकाला कोणत्या योजना पात्र ठरू शकतात याबाबतचे पत्र मा.मुख्यमंत्री यांचे नागरिकाला प्राप्त होते.या वेबपोर्टल वर अधिकाधिक लोकांनी नावनोंदणी करावी यासाठी संस्थेच्या वतीने खूप सारे काम करण्यात आले आहे.

## उद्दिष्ट्ये

- सरकारी योजना अधिकाधिक नागरिकांना कशा प्राप्त होतील यासाठी प्रयत्न करणे.
- सरकारी योजनांचा लाभ खऱ्या गरजूला मिळावा यासाठी प्रयत्न करणे.
- शासन आणि नागरिक यांच्या मध्ये समन्वयक म्हणून काम करणे.

## या उपक्रमाअंतर्गत झालेले कार्यक्रम

### १.महालाभार्थी पत्र वाटप –

दिनांक ३०-३-२०१८ रोजी फलोदे व सावरली गावातील सुमारे ३० नागरिकांना महालाभार्थी योजनेअंतर्गत मा.मुख्यमंत्री यांच्या सहीचे पत्र वाटप करण्यात आले.





## साध्य बाबी –

- महालाभार्थी अंतर्गत नोंदणी केल्यानंतर फलोदे गावातील एका नितीन शेळके नावाच्या युवकाला शेळी योजनेचे प्रकरण मंजूर होऊ शकते याबाबत त्याला माहिती मिळाली.त्यानुसार त्याने पाठपुरावा केला त्याला एक शेळी प्रकरण मंजूर झाले.या सर्व प्रक्रियेत संस्थेने योग्य ते सर्व सहकार्य  या युवकाला केले यामुळे आज या युवकाचा शेळी पालन व्यवसाय सुस्थित सुरु आहे.
- महालाभार्थी अंतर्गत नोंदणी केल्यानंतर सुमारे ४० पेक्षा अधिक लोकांना मा.मुख्यमंत्री यांचे सहीचे पत्र या नागरिकांना प्राप्त झाले.
- या पत्राच्या आधारे किमान १० वृद्ध महिला-पुरुष यांना निराधार पेन्शन योजना मंजूर झाली आहे.
- नागरिकाला कोणत्या शासकीय योजना प्राप्त होऊ शकतात याबाबत पहिल्यांदाच माहिती मिळाली.

# पर्यावरण विषयक उपक्रम

## प्रस्तावना

निसर्ग आणि माणूस यांचे परस्पर सबंध हे सहकार्याचे असतात.परंतु अलीकडील माणसाचा वाढलेला हव्यास व यांनतर झालेली निसर्गाची हानी हा पुढील काळात एकूणच मानवी जीवन अस्थिर करणारा असाच आहे.आदिवासी भागात आजही निसर्गाचे जतन पारंपारिक पद्धतीने केले जात आहे.या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या, मानवशास्त्र विभागाच्या सहाय्याने आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील देवराई यांचा अभ्यास करण्याचा विचार आहे.या अनुषंगाने या विभागाचे विभागप्रमुख डॉ.शौनक कुलकर्णी यांच्यासोबत दि.२८ जुलै २०१८ रोजी पुणे येथे बैठक पार पडली.यानंतर या प्रकल्पाची पूर्वतयारी करून हा हा अभ्यासप्रकल्प पूर्ण केला गेला.या अभ्यासात या भागातील देवराया व त्यांची सद्यस्थिती याचा सविस्तर अभ्यास केला गेला आहे.

## उद्देश –

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात असणाऱ्या देवराया यांची सद्यस्थिती समजावून घेणे.
- देवराया नष्ट होण्याचा मोठा धोका निर्माण होत आहे या पार्श्वभूमीवर या देवराया टिकतील कशा यासाठीची उपाययोजना सुचविणे.
- आदिवासी भागात देवराया विषयी असलेल्या विविध रूढी,परंपरा व संकेत यांचा अभ्यास करणे.
- देवराया व मानवी अस्तित्व यांचा परस्पर सबंध उलगडून दाखविणे.

## प्रकल्पाअंतर्गत झालेले उपक्रम –

### १.देवराई अभ्यासप्रकल्प –

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या, मानवशास्त्र विभागाच्या सहाय्याने आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील देवराई यांचा अभ्यास करण्याचा विचार आहे.या अनुषंगाने या विभागाचे विभागप्रमुख डॉ.शौनक कुलकर्णी यांच्यासोबत दि.४-९-२०१८ रोजी पुणे येथे बैठक पार पडली.लवकरच हा अभ्यासप्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.या अभ्यासात या भागातील देवराया व त्यांची सद्यस्थिती याचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.या अभ्यास प्रकल्पाविषयी तयार केलेल्या प्रश्नावल्या अंतिम करण्यात आल्या.हा अभ्यास प्रकल्प एकूण १० दिवस चालला.यासाठी प्रश्नावल्या तयार करून सुमारे ७० स्थानिक नागरिकांकडून भरून घेण्यात आल्या होत्या.व एकूण १० देवराई यांना भेटी देण्यात आल्या होत्या,यावेळी संस्थेचे कार्यकर्ते व सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाच्या संशोधक श्रीमती चैताली यांची टीम यांनी एकत्रित या सर्व देवराया यांना भेटी देऊन हा अभ्यास केला.हा अहवाल संस्थेकडे एक प्रत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे एक प्रत उपलब्ध आहे.

### २.वृक्षलागवड –

दरवर्षी संस्थेच्या वतीने वृक्षलागवड केली जाते.परंतु हि झाडे जगण्याचे प्रमाण फारच कमी आहे.या पार्श्वभूमीवर संस्थेच्या वतीने रोजगार हमी कायद्याच्या माध्यमातून वृक्ष लागवड कशी होईल यासाठी प्रयत्न केले जात आहे.यामध्ये मुख्यत मजुराला तीन वर्ष वृक्ष संगोपनाचे पैसे मजुरीपोटी दिले जातात,या पार्श्वभूमीवर या कायद्याची अंमलबजावणी गाव स्तरावर कशी होईल यासाठी प्रयत्न केले जात आहे.पुढील एक –दोन वर्षात या पाठपुराव्याचा सकारात्मक परिणाम नक्कीच दिसून येईल.

## साध्य बाबी –

- देवराया व स्थानिक आदिवासी समूह यांचे परस्पर सहकार्याचे नाते स्पष्ट झाले.
- देवराई यांची सद्यस्थिती समजून आली.
- देवराई संवर्धनात स्थानिक लोकांना सोबत घेऊन काय उपाययोजना करता येतील याविषयी काही निरीक्षणे समोर आली आहेत.
- देवराई संगोपनासाठी शासकीय स्तरावर काय प्रयत्न केले जावे याविषयी काही ठोस निरीक्षणे मांडता आली आहेत.

# संशोधन प्रकल्प

## प्रास्ताविक –

संस्थेचा मुख्य उद्देश हा संशोधनातून समोर आलेले निष्कर्ष घेऊन त्यावर आधारित विविध रचनात्मक कार्य करणे हा आहे. या अनुषंगाने यावर्षात दोन मुख्य संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यात आले.सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभाग व आपली संस्था यांच्या सहकार्यातून हे अभ्यासप्रकल्प पूर्ण झाले आहेत.यातील पहिला अभ्यासप्रकल्प म्हणजे देवराई यांची स्थिती,गती समजून घेणे हा होय व दुसरा म्हणजे कुपोषण प्रश्नाविषयक याविषयी निवडक गावात अंगणवाडी येथील मुलांची तपासणी करून कुपोषणाचे प्रमाण त्यामागचे कारण समजून घेण्यात आले आहे.

## उद्देश –

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात असणाऱ्या देवराई यांची सद्यस्थिती समजून घेऊन त्याविषयीचे अभ्यास आधारे मांडणी करणे.
- आंबेगाव तालुक्यातील निवडक गावातील मुलांची कुपोषण विषयक स्थिती समजून घेणे व त्याची कारणमीमांसा करणे.

## या प्रकल्पा अंतर्गत झालेली कामे –

**१.देवराई अभ्यासप्रकल्प** – याविषयी सविस्तर माहिती पर्यावरण या कार्यक्रमात दिलेली आहे.त्यामुळे ती पुन्हा उद्बोधित करीत नाही.

### २.कुपोषण विषयक अभ्यास –

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील सुमारे १० गावात हा अभ्यासप्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभाग व आपली संस्था यांच्या सहकार्यातून हे अभ्यासप्रकल्प पूर्ण केलेला आहे.या अभ्यासप्रकल्पात मुख्यत;अंगणवाडी येथे भेट देऊन येथील मुला-मुलींची तपासणी करण्यात आली आहे.यानंतर या मुलांच्या घरी भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे.मुलांच्या पालकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.शासकीय योजना व त्यांचा मिळणारा लाभ याविषयी हि माहिती घेण्यात आली आहे.या आधारे कुपोषणाचा प्रश्न त्याची तीव्रता समजून घेण्यात आली.हा अभ्यास अहवाल अद्याप प्रकाशित करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभाग व आपली संस्था यांची एकत्रित ३ ते ४ संशोधक विद्यार्थी या कामासाठी वेळ देत होते.

## साध्य बाबी

- हे दोन्ही अभ्यास प्रकाशित झाल्यानंतर या विषयाबाबत काय सद्यस्थिती आहे हि वस्तुस्थिती समोर येईल.

## साध्य बाबी-

## संस्थेचे कार्यकारी मंडळ

- प्रा.शरद जावडेकर – अध्यक्ष
- राजीव जोशी – उपाध्यक्ष
- अमोल वाघमारे –सचिव
- हनुमंत भवारी – खजिनदार
- ad.नाथा शिंगाडे – सदस्य
- सुवर्णा पेकारी – सदस्य
- गिरीश गांधी – सदस्य